



दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक





● वर्ष : ०२ ● अंक : १२ ● पुणे ● सोमवार, दि. १७ फेब्रुवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313





सोसायटीची निवडणूक बिनविरोध करण्यात यश 3





पुण्याच्या लक्झरी रिअल इस्टेटमध्ये मार्व्हल... 4


## ठळक बातम्या

### तरुणीची ३५ लाखांची फसवणूक

**पुणे (आरंभ पर्व) :** विवाहाचे आमिष दाखवून संगणक अभियंता तरुणीची ३५ लाख रुपयांची फसवणूक केल्याची घटना बाणेर परिसरात घडली. या प्रकरणी बाणेर पोलिसांनी एका तरुणाला मुंबईतून अटक केली आहे. साईश विनोद जाधव (वय २५, रा. शेल कॉलनी रस्ता, चेंबूर, मुंबई) असे अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत एका २९ वर्षीय तरुणीने बाणेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी या तरुणावर भारतीय न्याय संहिता ३१८ (४) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही तरुणी बाणेरमधील मुलींच्या वसतिगृहात राहत असून, एका आयटी कंपनीत अभियंता आहे. या तरुणीने २०२३ मध्ये एका विवाहविषयक संकेतस्थळावर नोंदणी केली होती. आरोपी साईशने संकेतस्थळावर दिलेल्या मोबाईल क्रमांकावरून तरुणीशी संपर्क साधला. त्यानंतर तो तिला भेटण्यास बाणेर परिसरात आला. तरुणीने त्याच्या कुटुंबीयांबाबत विचारणा केली. तेव्हा त्याने खोटी माहिती देवून तरुणीचा विश्वास संपादन केला.

# धनंजय मुंडेंविरोधात सुरेश धस पुन्हा आक्रमक

## कृषी विभागात तेलबिया उत्पादकता वाढीसाठीच्या निर्णयांची माहिती मागितली

**बीड (दै. आरंभ पर्व)**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात भाजप आमदार सुरेश धस आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्यात आरोप - प्रत्यारोप अद्यापही सुरूच आहेत. दरम्यान सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेतली होती. त्यामुळे दोघात वाद मिटला असल्याचे बोलले जात असतानाच दुसरीकडे धस यांनी पुन्हा आक्रमक पवित्रा घेतला आहे. या संदर्भात आमदार सुरेश धस यांनी कृषी विभागाला एक पत्र पाठवून तेलबियांच्या उत्पादकता वाढी संदर्भात धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात घेण्यात आलेल्या निर्णयाची माहिती मागितली आहे. यात कापूस, सोयाबीन तेल बियांची उत्पादकता वाढवण्यासाठीच्या पत्रव्यवहाराची माहिती देखील मागवण्यात आली आहे.

एकीकडे संतोष देशमुख हत्या प्रकरणात आमदार सुरेश धस हे धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करत असताना या दोन्ही नेत्यांमध्ये भेट घडवण्यात आली. त्यासाठी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुढाकार घेतला. त्यानंतर आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणातून माघार घेतली असल्याचा आरोप त्यांच्यावर केला गेला. मात्र या आरोपाला सुरेश धस यांनी देखील उत्तर दिले आहे. इतकेच नाही तर धनंजय मुंडे मंत्री असताना कृषी विभागातील भ्रष्टाचाराच्या संदर्भात देखील ते चांगलेच आक्रमक झालेले पाहायला मिळत आहेत. यातच आता आमदार सुरेश धस यांनी मागितलेल्या माहितीतून काय समोर येईल? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

धनंजय मुंडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात कृषी मंत्री होते. त्यांच्या कृषी मंत्री पदाच्या कार्यकाळात त्यांनी घेतलेल्या निर्णयाची माहिती द्या, असे पत्र सुरेश धस यांनी कृषी विभागाच्या सचिवांना पाठवले आहे. या पत्रामध्ये त्यांनी अधिकाऱ्यांनी कोट्यवधींचा भ्रष्टाचार केला असल्याचा आरोप देखील केला आहे. या माध्यमातून सुरेश धस पुन्हा एकदा धनंजय मुंडे यांच्या प्रकरणात चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. सुरेश धस यांच्या या पत्रामुळे आता धनंजय मुंडे यांच्या अडचणी आणखी वाढता का? हे पहावे लागेल.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण लावून धरणारे भाजप आमदार सुरेश धस यांनी या प्रकरणी चौफेर टीका सहन करणाऱ्या मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतल्यामुळे एकच खळबळ माजली आहे. या भेटीवर विरोधकांकडून टीकेची उठल्यानंतर सुरेश धस यांनी आपली बाजू मांडली होती. जोपर्यंत संतोष देशमुखांच्या आरोपींना फाशी होणार नाही तोपर्यंत मी ठाम राहणार असल्याचे सुरेश धस म्हणालेत. या प्रकरणात मी शेवटपर्यंत लढा देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कुणीतरी अतिशय व्यवस्थितपणे यामध्ये षडयंत्र रचले आहे. ज्यांनी षडयंत्र रचले, त्यांचा मी बंदोबस्त करणार, असा इशाराही धस यांनी दिला होता.



**आम्हा देशमुख कुटुंबीयांना न्याय हवा आहे. त्यासाठी सर्व घटकांची आम्हाला खूप गरज आहे. मनोजदादा आले नसते तर हा खून आठ ते दहा दिवसात त्यांनी पचवला असता, असंही ते म्हणाले. तसेच मनोज जरांगे पाटील यांनी धस यांच्यावर टीका केली. त्यावरही धनंजय देशमुख यांनी भाष्य केलं. यात दादाची (मनोज जरांगे) भावना मोठी आहे. या प्रकरणातील एकही आरोपी सुट्टू नये म्हणून त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. यात काहीही चूक नाही.**


## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमदार सुरेश धस यांच्या पाठिशी



**राज्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून मंत्री धनंजय मुंडे आणि भाजप आमदार सुरेश धस यांच्या भेटीवरुन चर्चा रंगली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आवाज उठवणारे आमदार सुरेश धस हे मंत्री धनंजय मुंडे यांनी भेटल्यामुळे मनोज जरांगेसह विरोधकांनी आमदार धस यांना लक्ष केले आहे. या प्रकरणावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जळगावातून प्रतिक्रिया देत विरोधकांना टोलवले आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे, हा हेतू ठेवून आमदार सुरेश धस काम करत आहे. या प्रकरणात ते पुढाकार घेत असल्यामुळे काही लोकांच्या पोटात दुखत आहे, असा टोला मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना लगावला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, कोण कुणाला भेटले याच्यावर जर अशा पद्धतीचा राजकारण होत असेल तर लोकशाहीमध्ये ते योग्य नाही. लोकशाहीमध्ये संवाद हा सुरू राहिला पाहिजे. सुरेश धस यांनी या प्रकरणांमध्ये गंभीर भूमिका घेतलेली आहे. ती सर्वांनी बघीतली आहे. ते गंभीर भूमिका घेत असताना त्या माध्यमातून संवादच तोडून टाकायचा असे करणे योग्य नाही. शेवटी धनंजय मुंडे हे सुद्धा राज्याचे मंत्री आहेत. त्यामुळे एखादा आमदार, एखाद्या मंत्र्याला भेटला तर काही फरक पडत नाही. खासदार संजय राऊत यांच्याबद्दल विचारलेल्या प्रश्नावर देवेंद्र फडणवीस यांनी एका वाक्यात उत्तर दिले. ते म्हणाले, मुर्खांना मी उत्तर देत नाही. हे माहीत असतानाही तुम्ही हा विचारतात, असे ते म्हणाले. अमृता फडणवीस यांच्या गाण्याबाबत बोलताना फडणवीस यांनी सांगितले की, संत सेवालाल महाराजांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर ते गाणे रिलीज झाले आहे. फक्त बंजाराच नाही तर सर्व समाजाला ते गाणे आवडलेले आहे. एक प्रकारे ते आपल्या गुरूच्या प्रती, संतांच्या प्रती एक आराधना आहे.**









# लोकप्रिय योजनांना निधी टंचाईची कात्री...!

लोकप्रिय योजनेच्या बरोबरीनेच तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांची कृषी वीज बिले देखील सरसकट माफ करून टाकली त्याचबरोबर लाडका भाऊ योजनादेखील सुरू केली मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनादेखील सुरू केली आणि त्यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीतील गंगाजळी एकदम दोन लाख कोटींनी घसरली. कोणत्याही राज्यासाठी विकासकामे करण्यासाठी अथवा चालू असलेली महत्त्वकांक्षी विकास प्रकल्पांची कामे पूर्ण करण्यासाठी पुरेशा निधीची उपलब्धता असणे हे फार गरजेचे असते. मात्र इथे तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी महाआघाडीकडे गेलेले लोकमत पुन्हा महायुतीकडे वळवण्यासाठी लोकप्रिय सरकारी योजनांचा अक्षरशा धडाका लावला आणि त्याचा परिणाम म्हणजे आता राज्य सरकारच्या तिजोरीत खडखडाट झाला आहे. तब्बल दोन लाख कोटींची महसुली तूट ही राज्याची आजवरच्या इतिहासातील रेकॉर्डब्रेक तूट आहे. लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात महायुतीला जो मोठा राजकीय फटका बसला आणि महाआघाडीचे ४८ पैकी तब्बल ३१ खासदार हे राज्यातून निवडून आले त्यामुळे त्यानंतर चार महिन्यांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकांमध्ये कोणत्याही परिस्थितीत राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार सत्तारूढ होण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पूर्णपणे फ्रीहँड देण्यात आला होता. एकदा शिंदे यांनीही मग जनतेला महायुतीकडे आकर्षित करण्यासाठी कोणतीही कसर सोडली नाही. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना लाडका भाऊ योजना शेतकरी कृषी वीज बिल माफी आणि त्याचबरोबर शहरांमधील मतदारांसाठी टोल माफी असे मोठे धाडसाचे धडाकेबाज निर्णय हे मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी मोठ्या धडाडीने घेतले. एकनाथ शिंदे हे केवळ निर्णय घेऊन थांबले नाहीत, तर या निर्णयांची जनतेमध्ये तळागाळापर्यंत कशी अंमलबजावणी होईल याची पुरेपूर काळजी त्यांनी घेतली आणि त्यामुळे लोकसभा निवडणुकीत महायुतीचं झालेलं पनीपत हे अक्षरशः व्याजासह महायुतीने भरून काढले. साहजिकच या लोकप्रिय योजनांचा आर्थिक भार हा शेवटी राज्याच्या तिजोरीवर पडला आणि आता राज्य सरकार पुढे या योजना सुरू ठेवण्याचे मोठे प्रबळ आव्हान उभे टाकले आहे. याचं प्रमुख कारण म्हणजे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना की जी राज्यामध्ये विधानसभा निवडणुकांचे निकाल फिरवण्यामध्ये गेम चेंजर ठरली या योजनेवरतीमुळे वर्षाला तब्बल ४६हजार कोटींचा बोजा राज्याच्या तिजोरी वरती पडला होता. कोणतेही राज्य सरकार अथवा केंद्र सरकार देखील एवढ्या मोठ्या प्रमाणावर महसुली उत्पन्नात झालेली तूट ही भरून काढू शकत नाही. त्यामुळेच अखेरीस नाईलाजाने राज्य सरकारने यापूर्वी निवडणुकांच्या हंगामात जाहीर झालेल्या सर्व लोकप्रिय योजनांना कात्री लावण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. अर्थात



राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अर्थमंत्री व दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार हे अत्यंत कुशल असे नेते आहेत. राज्याला या परिस्थितीमधून देखील सही सलामत सुखरूप बाहेर कसे काढायचे यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अर्थमंत्री अजितदादा पवार हे दोघेही तसे निष्णात आहेत. आणि त्यामुळेच आता राज्य सरकारने ३१ मार्चपर्यंत करावयाच्या विविध सरकारी खर्चामध्ये ३० टक्के कपात करण्याचा निर्णय घेतला आहे.

अर्थात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे राज्य सरकारचे आर्थिक स्थिती भक्कम असल्याचे सांगत आहेत आणि साधारणपणे कोणतीही लोकप्रिय योजना बंद होणार नाही हे अशी ग्वाही देखील त्यांनी सातत्याने दिली आहे. मात्र एकीकडे असे असताना दुसरीकडे राज्य सरकारच्या करावयाच्या खर्चामध्ये ३० टक्के कपात लागू केल्यामुळे महसुली तूट काही प्रमाणात तरी भरून निघेल असं राज्य सरकारच्या तज्ज्ञांचा अंदाज आहे. याचाच एक भाग म्हणजे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची राज्य सरकारने स्क्रुटणी चालू केली असून त्यामध्ये तब्बल पाच लाखांहून अधिक बहिणी या आतापर्यंत अपात्र ठरलेल्या आहेत. लाडकी बहीण या योजनेचे लाभ घेताना ज्या अटी शर्तींची पूर्तता करणे आवश्यक होते त्या अटी शर्तींची पूर्तता होत नसताना देखील या पाच लाख बहिणींनी लाडक्या बहीण योजनेचे लाभ घेतल्याचे उघड झाले आहे आणि त्याच्यामुळेच या लाडक्या बहिणींकडून गेले काही महिने त्यांच्या बँक खात्यामध्ये या योजनेद्वारे जमा झालेले पैसे हे आता पुन्हा कसे वसूल करायचे असा प्रश्न राज्याच्या प्रशासकीय अधिकाऱ्यांबरोबरच अर्थमंत्र्यांपुढेही पडला आहे. चालू आर्थिक वर्षात राज्य सरकारने अर्थसंकल्पीय तरतुदींमध्ये विविध विकासकामांवर तसेच अन्य राज्य सरकारी खर्चांवर ८ लाख २३ हजार कोटींचे अर्थसंकल्पीय तरतूद केली होती त्यातील राज्य सरकारने सहा लाख १८हजार कोटी प्रत्यक्षात विविध विभागांना खर्च करण्यासाठी वितरित केले होते मात्र प्रत्यक्षात १५ फेब्रुवारी पर्यंत या तरतुदी पैकी ४७% निधी अद्याप पर्यंत खर्च झाला असून ती रक्कम तीन लाख कोटी ८६ हजार एवढीच आहे. त्यामुळेच ३१ मार्चपर्यंत जर राज्य सरकारने अशाच प्रकारे काटकसरीचे धोरण यापुढेही सुरू ठेवले, तर जी दोन लाख कोटींवर राज्य सरकारची महसुली तूट गेली आहे ती भरून निघण्यास मोठ्या प्रमाणावर हातभार लागू शकेल असे एकूण राज्यातले आर्थिक चित्र आहे. आणि यासाठीच राज्य सरकारने जवळपास सर्वच सरकारी खर्चांवरती ३०% कपात करण्यास सुरुवात केली आहे.

यामध्ये आमदार स्थानिक विकास निधी त्याचबरोबर सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन पेन्शन सरकारी कार्यालयांची वीज बिले असे जर अत्यावश्यक खर्चाच्या बाबी सोडल्या तर जवळपास अन्य सर्वच ठिकाणी ही ३० टक्के खर्च कपात लागू करण्यात आली आहे. ३१ मार्चपर्यंत जर अशाच काटकर पद्धतीने खर्चावर नियंत्रण आणले गेले, तर राज्य सरकारची महसुली तुटीची चिंता ही काही प्रमाणात दूर होईल आणि मग किमान आगामी आर्थिक वर्षात तरी राज्य सरकारला नवीन विकास योजनांसाठी त्याचप्रमाणे मागील महत्त्वपूर्ण विकास प्रकल्प पुढे पूर्णत्वाच्या दिशेने देण्यासाठी निधीची उपलब्धता होऊ शकेल याद्दष्टीने राज्य सरकार कार्यरत आहे. अर्थात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सरसकट कोणत्याही योजना बंद करणार नाही त्याचे कारण त्याचे राजकीय परिणाम हे शेवटी महायुती वरती होऊ शकतात आणि आगामी काळात राज्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जर लक्षात घेतल्या तर लोकप्रिय योजना बंद करणे हे महायुतीला धोक्याचे ठरू शकते आणि त्यामुळेच या लोकप्रिय योजनांवरती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे खूप सावधपणे काम करत आहेत. जरी या योजना पूर्णपणे बंद करता येत नसल्या किंवा ते करणे हे राज्य सरकारच्या लोकप्रियतेच्या द्दष्टीने योग्य नसले तरी देखील या योजनांमधील गैरप्रकार त्रुटी अथवा त्याचा जो काही गैर लाभ लाभार्थ्यांनी घेतलेला आहे त्याला नियंत्रण करणे हा राज्य सरकारचा यापुढचा प्रयत्नांचा भाग असणार आहे.

यामुळेच आगामी महिन्यात होऊ घातलेल्या राज्य सरकारच्या मुंबई येथील विधिमंडळ आर्थिक अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कठोर आर्थिक शिस्त लागू करणारे अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार हे नेमके महाराष्ट्रातल्या सर्वसामान्य जनतेसाठी या अर्थसंकल्पात कोणकोणत्या नवीन योजना घेऊन येतात हे पाहणे तितकेच उत्सुकतेचे ठरणार आहे.

# नैसर्गिक प्रसुतीसाठी महिलांनी बर्थ कंपेनियनचा आधार घ्यावा

**डॉ. अशोक काळे**

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

अखिल भारतीय ग्राहक पंचायत, हवेली तालुका व आरोग्य विभाग पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने लज्जागौरी मोहीम अंतर्गत नैसर्गिक प्रसुतीची विषयीची माहिती हा कार्यक्रम प्राथमिक आरोग्य केंद्र, कुंजीरवाडी येथे घेण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून ग्राहक पंचायतचे संस्थापक सदस्य व नैसर्गिक प्रस्तुती तज्ञ डॉ. अशोक काळे हे उपस्थित होते.

सुलभ नैसर्गिक प्रसुतीसाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत, हवेली तालुका व आरोग्य विभाग पंचायत समिती, हवेली यांच्याकडून हाती घेण्यात आलेल्या लज्जागौरी मोहिमेअंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भानुदास सरडे, मध्य महाराष्ट्र प्रांत सदस्य हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कुंजीरवाडी येथील प्रसिद्ध डॉ. अविनाश मराठे हे होते.



यावेळी डॉ. अशोक काळे म्हणाले जगातील बहुतेक विकसित देशातील महिलांच्या प्रसुतीच्या काळात सिझेरियनचा हा दर १०% च्या आसपास असताना भारतात तो ६० % आहे. आपल्या पूर्वजांनी नैसर्गिक प्रसुतीसाठी आडवे न झोपता उभ्याने किंवा पायाच्या चवड्यावर बसून प्रसुती करण्यासाठीचे तंत्रज्ञान आत्मसात केले होते. यालाच लज्जागौरी म्हणून संबोधण्यात येते. प्रसुतीगृहात मातेला बाळंतपणात होणारा तणाव दूर करण्यासाठी तिच्या जवळच्या महिला नातेवाईक किंवा इतर महिलेस तिच्यासोबत प्रवेश दिल्यास बाळंतपण व प्रसुती पश्चात कालावधीमध्ये मातेचे मानसिक स्वास्थ चांगले राहण्यासाठी मदत होते. यामुळे नवजात अभ्रकाचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते, वेदनाशक औषधांची आवश्यकता कमी भासते, बाळंतपणाचा अनुभव सुखद असल्याची जाणीव होते, बर्थ कंपेनियनची निवड करताना प्रसुती मातेची आई, सासू, बहीण, जाऊ, नणंद किंवा कुटुंबातील इतर स्त्री याबरोबर असाव्यात त्यामुळे प्रसुती पश्चात उदासीनतेचे प्रमाण कमी होते. तसेच नैसर्गिक प्रसुतीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचाच आधार घ्यावा जेणेकरून आपलं सिजेरियन टळेल व खर्च देखील कमी होईल असे डॉ. काळे यांनी सांगितले.

पूर्वी केर काढणे, जात्यावर दळण दळणे, जिने खाली वर करणे, खाली बसून धुणे भांडी करणे, पाटावरवंटा वाटणे हे आता कालबाह्य झाले आहे. त्यामुळे जीवन शैलीत बदल झाले, परिणामी सिझेरियनचे प्रमाण वाढले. आमच्याकडे नाव नोंदणी केल्यास याबाबत सर्व सुविधा विना खर्च व घरपोच सोडणे देखील मोफत केले जाते. तसेच आम्ही सिझेरियन न करता शक्यतो नैसर्गिक प्रसुतीलाच प्राधान्य देतो. अशी माहिती प्राथमिक आरोग्य केंद्र प्रमुख कुंजीरवाडी च्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रूपाली लोखंडे यांनी दिली.

या कार्यक्रमासाठी डॉ. अशोक काळे नैसर्गिक प्रस्तुती तज्ञ, डॉ. अविनाश मराठे, ग्राहक पंचायत मध्य महाराष्ट्र प्रांताचे सदस्य भानुदास सरडे, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र कुंजीरवाडी च्या डॉ. रूपाली लोखंडे, डॉ. रूपाली बंगाळे, पुणे महिला आघाडी प्रमुख भाजपा च्या सौ. पूनमताई चौधरी, पुणे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद सदस्य संदिप शिवरकर, ग्राहक पंचायत तालुका अध्यक्ष कैलास भोरडे, तसेच आरोग्य सेवक, गटप्रवर्तक, आरोग्यसेविका, सेवक वृंद तसेच गरोदर माता भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राघवदास चौधरी यांनी केले, तर आरोग्यसेवक सुनील वाघमारे यांनी आभार मानले .

# ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पर्यावरण विषयक गाणी, कविता, चित्रकलेतून पर्यावरण रक्षणाचा संदेश आणि प्रभावी नाट्य सादरीकरणातून पर्यावरण संवर्धनाचा जागर यातून आज पुण्यातील शालेय विद्यार्थ्यांनी त्यांची पर्यावरण रक्षणाप्रती असलेली जागरूकता दाखवून दिली. निमित्त होते, वनराई संस्थेचे संस्थापक, माजी केंद्रीय मंत्री, पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया यांच्या जन्मशताब्दी वर्षांच्या पार्श्वभूमीवर आयोजित वनराई इको क्लब पर्यावरण शिक्षण उपक्रमाचे. या उपक्रमात 50 शाळांमधील 400 विद्यार्थी सहभागी झाले होते.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लिट्ल चॅम्प फेम गायिका अंजली गायकवाड, वनराई चे विश्वस्त डॉ. रोहिदास मोरे. सागर धारिया, वनराईचे सचिव अमित वाडेकर, बबनराव कानकिरड आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना सागर धारिया म्हणाले, वातावरणातील बदलामुळे गेल्या काही वर्षांपासून पावसाचे चक्र बदलले आहे. आपण हे बदलेल चक्र ठीक करण्यासाठी आपापल्या परीने प्रयत्न केले पाहिजेत. किमान आपल्या घरात येणाऱ्या पाण्याची बचत जरी केली तरी खूप मदत होईल. कारण छोट्या छोट्या गोष्टीच मोठे बदल घडवू शकतात.

# एसटी चालकांनी निर्व्यसनी असावे - डॉ. विनोद मतनानी

**किरण खुडे**

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

प्रवाशांना इच्छितस्थळी सुरक्षित पोहचवण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणाऱ्या एसटीच्या कर्मचाऱ्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी. तसेच व्यसनांपासून लांब रहावे. असे मत येथील ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे ब्रम्हाकुमार डॉ. विनोद मतनानी यांनी प्रतिपादन केले.




येथील राजगुरुनगर एसटी आगारात चालक दिनानिमित्त आयोजीत कर्मचारी सन्मान कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपिठावर ब्रम्हाकुमारी दिपाली दिदी, आगारव्यवस्थापक उज्वला कुटे, स्थानक प्रमुख टी. एन. पवळे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक एम. एफ. सय्यद, कार्यशाळा अधिक्षक अनंत कुंदे उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, बस चालकांनी सकारात्मक मानसिकता ठेवावी. प्रवासी हे दैवत असून त्यांच्यासह आपली संस्था असलेल्या एसटी महामंडळाची प्रतिष्ठा राखली पाहीजे.

याप्रसंगी आगारव्यवस्थापक उज्वला कुटे व मान्यवरांची भाषणे झाली. विना अपघात उत्कृष्ठ कामगिरी व उत्पन्नवाढ करणारे आदर्श चालक महादेव तुळसे, विष्णू भोईर, दशरथ लांडे, तात्याबा कोळेकर, राजेश कांबळे यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यांना विनाअपघात सुरक्षीत सेवेचे पदक देण्यात आले.

कार्यक्रमासाठी स्नेहा कातोरे, साक्षी बिराजदार, मनिषा सुतार, रुपाली मरभळ, रोहिणी साबळे, निलेश सातकर, प्रशांत होले, वैभव सावंत, रवींद्र राठोड उपस्थित होते. कार्यक्रमापूर्वी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. सुत्रसंचलन दत्तात्रय गभाले यांनी केले. तर आभार नागेश्वर वैरागर यांनी मानले.

## भारतीय क्रिकेटपटू राहुल त्रिपाठी याच्या उपस्थितीत

# सहाव्या 'सिंधी प्रीमिअर लीग'चे शानदार उद्घाटन

**पिंपरी-पुणे (दै. आरंभ पर्व)**

'सिंधी प्रीमिअर लीग'च्या सहाव्या पर्वाचे भारतीय क्रिकेटपटू राहुल त्रिपाठी याच्या उपस्थितीत शानदार उद्घाटन झाले. येत्या ९ मार्चपर्यंत चालणारी ही क्रिकेट स्पर्धा पिंपरीतील मृणाल क्रिकेट ग्राउंडवर होत आहे. उद्घाटन सोहळ्यावेळी उद्योजक डब्बू आसवानी, श्रीचंद आसवानी, संयोजक कन्वल खियानी, हितेश दादलानी, कमल जेठानी, अंकुश मुलचंदानी, नरेश नशा, करण अस्वाणी, अवि तेजवानी, अवि इसरानी, कुणाल गुडेला, पियुष जेठानी आदी उपस्थित होते.



राहुल त्रिपाठी म्हणाला, "क्रिकेट हा सर्वांना एकत्र आणणारा खेळ आहे. सर्व कुटुंबाना एकत्र आणून उत्साहाने ही स्पर्धा खेळली जात आहे. मानसिकदृष्ट्या ताजेतवाने आणि शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त राहण्यासाठी मैदानी खेळ खेळायला हवेत. सिंधी समाजाने घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद आहे. खेळाडूंबरोबर त्यांची मुले मैदानात आल्याने वातावरणात ऊर्जा संचारत आहे. समाजातील तरुणांमध्ये खेळभावना रुजवण्यासाठी ही लीग महत्वाची आहे. संघभावना आणि प्रामाणिकपणे या खेळाचा आनंद घ्यावा." कन्वल खियानी म्हणाले, "सिंधी समाजातील तरुणांना खेळांसाठी प्रोत्साहन देण्यासह सिंधी संस्कृतीचे जतन आणि सामाजिक भावनेतून सेवाभावी संस्थांना मदत करण्याच्या उद्देशाने गेल्या सहा वर्षांपासून ही क्रिकेट स्पर्धा होत आहे. या स्पर्धेत पुरुष गटात एकूण १६, तर महिला गटात एकूण आठ संघ सहभागी झाले आहेत. पुरुषांच्या प्रत्येक संघाचे नाव सिंधी संस्कृतीशी, तर महिला संघांची नावे नद्यांशी निगडित आहेत. महिलांमध्ये ९०, तर पुरुषांमध्ये २५१ खेळाडूंनी सहभाग नोंदवला आहे."

या स्पर्धेतील पुरुष गटामध्ये मस्त कलंदर, सुलतान ऑफ सिंध, मोहेंजोदरो वॉरियर्स, सिंधफूल रेंजर्स, एसएसडी फाल्कन, इंडस डायनामॉस, दादा वासवानीज ब्रिगेड, झुलेलाल सुपरकिंग्ज, हेमू कलानी ग्लॅडिएटर्स, गुरुनानक नाइट्स, संत कंवरम रॉयल्स, आर्यन्स युनायटेड, जय बाबा स्ट्रायकर्स, सिंधी इंडियन्स, अजराक सुपरजायंट्स व पिंपरी योद्धाज, तर महिलांच्या संघात गंगा वॉरियर्स, गोदावरी जायंट्स, झेलम क्वीन्स, सिंधू स्टारलेट्स, यमुना स्ट्रायकर्स, नर्मदा टायटन्स, कृष्णा सुपरनोव्हाज आणि इंद्रायणी थंडरबोल्ट्स यांचा समावेश आहे.

# थोडक्यात



## राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्याकडून देहूत सांत्वनपर भेट

देहू (आरंभ पर्व) : देहू येथे संत तुकाराम महाराजांचे ११ वे वंशज आणि प्रसिद्ध शिवव्याख्याते ह.भ.प. शिरीष महाराज मोरे ह्यांचे नुकतेच आकस्मित निधन झाले. राज्यमंत्री श्रीमती माधुरी मिसळ ह्यांनी आज देहूतील शिरीष महाराज मोरे ह्यांच्या निवासस्थानी भेट देवून त्यांना श्रद्धांजली वाहिली. तसेच त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. शिरीष महाराज मोरे ह्यांनी अत्यंत तरुण वयातच सुरू केलेल्या अध्यात्मिक आणि सामाजिक कार्याचा आदर्श ठेवून पुढे कार्यरत राहणे हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरेल असे मनोगत त्यांनी ह्या प्रसंगी व्यक्त केले.


## बाजार समिती संचालक सयाजी मोहिते यांचा हमाल परवाना रद्द

राजगुरुनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : येथील कृषी उत्पन्न बाजार समिती खेडचे संचालक सयाजी माणिक मोहिते यांनी सन २०२४-२५ मध्ये झालेल्या संस्थेच्या निवडणुकीत नूतनीकरण करून सादर केलेला हमाल परवाना रद्द करण्यात आला आहे. खेड तालुका सहकारी संस्थांचे सहायक निबंधक सचिन सरसमकर यांनी हा आदेश दिला. बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांच्या सत्ताधारी गटात सयाजी मोहिते सहभागी झाले आहेत. पूर्वी ते माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या गटातून बाजार समितीत कार्यरत होते. संचालक सयाजी मोहिते हे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या पॅनेलमधून दोन वेळा निवडून आले आहेत. सयाजी मोहिते यांच्या दाखल्यावर बापू बाळू थिगळे यांनी आक्षेप घेतला होता. त्याची पडताळणी करण्यात आली. त्यांनी मागील निवडणुकीदरम्यान दाखला नूतनीकरण केला. मात्र, त्यासाठी किती काम केले आणि किती मोबदला मिळवला याबाबत माहिती दिली नसल्याचे निदशर्नास आले. विपर्यास करून दाखला मिळवला, असा ठपका ठेवत सहायक निबंधक सचिन समरसकर यांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७मधील नियम ७ (३) मधील नमूद अटींचा भंग केला आहे, असा निष्कर्ष नोंदवून मोहिते यांचा दाखला रद्द ठरवला. दरम्यान, यावर न्यायालयात दाद मागितली जाईल, असे सयाजी मोहिते यांनी सांगितले. तसेच आमचे एक संचालक अशोक राक्षे यांना अशाच प्रकारे टार्गेट करण्यात आले होते. मोहिते यांचा परवाना रद्द झाल्याने त्यांचे संचालकपद अथवा बाजार समितीच्या कामकाजावर कोणताही परिणाम होणार नसल्याचे याविषयी बोलताना सभापती विजयसिंह शिंदे पाटील यांनी सांगितले.

## डिजिटल क्रांती आणि आर्थिक वाढीबाबत चर्चा

पुणे (आरंभ पर्व) : "भारत डिजिटल क्रांतीचे नेतृत्व करत असून बीएसएनएलने १७ वर्षांनंतर २६२ कोटी रूपयांचा नफा कमावला आहे," अशी घोषणा भारताचे ईशान्य प्रदेशाचे जनसंपर्क व विकास मंत्री ज्योतिरादित्य एम. सिंधिया यांनी टाइम्स ग्रुप ईटी नाऊ ग्लोबल बिझनेस समिट २०२५ मध्ये केली. नवी दिल्ली येथील ताज पॅलेसमध्ये आयोजित उद्घाटनाच्या सत्रात बोलताना ज्योतिरादित्य सिंधिया म्हणाले की, "आज डिजिटल पायाभूत सुविधांनी प्रत्यक्ष पायाभूत सुविधांची जागा घेतली आहे आणि जगातील डिजिटल व्यवहारांच्या तब्बल ४६ टक्के व्यवहार भारतात होत असल्यामुळे सर्वाधिक अद्ययावत डिजिटल वातावरणासह भारताने जगात आघाडी घेतली आहे. या प्रगतीचे चमकदार उदाहरण बीएसएनएल आहे. या कंपनीने १७ वर्षांत प्रथमच नफा कमावला आहे."

## थोडक्यात



### कोहींडे येथे विहिरीत पडलेल्या भेकराला जीवदान

राजगुरुनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : विहिरीच्या पाण्यात पडलेल्या भेकराला शेतकऱ्याच्या सतर्कतेने जीवदान मिळाले. ही घटना कोहींडे बुद्रुक (ता. खेड) येथील रौंधळवाडी गावच्या शिवारात गुरुवारी (दि. १३) घडली. शेतकरी रामदास चिखले हे कृषीपंप सुरू करायला गेले असता, त्यांना विहीरीच्या पाण्यात भेकरू पोहत असल्याचे दिसले. त्यांनी खेड वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. राजगुरुनगर वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी यादवराव जाधव यांनी तातडीने कोहींडे येथे रेस्क्यू पथक पाठवले. या पथकाने भेदरलेल्या भेकराला बाहेर काढले. बाहेर आल्याबरोबर भेकराने झेप घेत डोंगराकडे पलायन केले. भेकर अंदाजे एक वर्ष वयाचे असल्याचे वनाधिकाऱ्यांनी सांगितले. वनपरिक्षेत्र अधिकारी यादव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल प्रशांत जाधव, अंकुश बुट्टे, विशाल केदारी, कैलास दाभाडे, विश्वनाथ गिजरे यांनी रेस्क्यू पथकात सहभाग घेतला, तर शेतकरी रामदास चिखले यांसह ग्रामस्थ संदीप भागे, जीवन खंडे, अक्षय खंडे, रमेश कदम, उत्तम चिखले यांनी वन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहकार्य केले.




### लव फिल्म्स निर्मित "देवमाणूस" चित्रपटाचा टीझर लॉंच

मुंबई, भारत (आरंभ पर्व) : लव फिल्म्स निर्मित "देवमाणूस" सिनेमाचा टिझर नुकताच रिलीझ झालाय. या बहुप्रतिक्षित मल्टीस्टारर चित्रपटात मराठी सिनेसृष्टीतील दमदार कलाकार महेश मांजरेकर, रेणुका शहाणे आणि सुबोध भावे यांच्या प्रमुख भूमिका आहेत आणि त्यांच्यासोबत लोकप्रिय अभिनेता सिद्धार्थ बोडके हे सुद्धा आहेत. या नव्या आणि लव फिल्म्सच्या पहिल्याच मराठी चित्रपटाची घोषणा झाल्यापासून, प्रेक्षकांचा उत्साह शिगेला पोहोचलाय आणि आता "देवमाणूस" चा टीझर पाहता प्रेक्षक वर्गाला एक आकर्षक सिनेमॅटिक अनुभव मिळणार आहे हे नक्की. देवमाणूसचा टीझर इथे पहा: https://bit.ly/DemanusTeaser या टीझरमध्ये आपण अभिनेता महेश मांजरेकर ह्यांना कधीही न पाहिलेल्या वारकरीच्या भूमिकेत पाहू शकतो, तसेच रेणुका शहाणे, सुबोध भावे आणि सिद्धार्थ बोडके यांचीही भूमिका अतिशय आकर्षक आणि जबरदस्त दिसत आहे. लक्ष वेधून घेणारे दृश्य आणि वेगवान साउंडट्रॅकसह, "देवमाणूस" चित्रपटाची भव्यता समजून येते. विशेष म्हणजे, देवमाणूसचा टीझर संपूर्ण महाराष्ट्रातील चित्रपटगृहांमध्ये विकी कौशलच्या छावा चित्रपटासह प्रदर्शित केला जाणार आहे, जे या मराठमोळ्या चित्रपटाला अपेक्षित असलेल्या उच्च प्रेक्षकवर्गा पर्यंत पोहोचवेल आणि त्याचा लाभ मिळेल. टीझर रिलीझच्या उत्साहात, दिग्दर्शक तेजस प्रभा विजय देऊस्कर म्हणतात, "देवमाणूस हा माझ्यासाठी अतिशय रोमांचक प्रोजेक्ट आहे कारण त्याची विलक्षण बांधणी आणि त्यातील पात्रांची सखोलता या प्रतिभावान कलाकारांनी जिवंत केली आहे. हा चित्रपट बनवण्याचा संपूर्ण प्रवास खूपच मनोरंजक आहे आणि या टीझरद्वारे प्रेक्षकांपर्यंत या सिनेमाची एक झलक शेअर करताना मला खूपच आनंद होत आहे. देवमाणूस २५ एप्रिल २०२५ रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होईल आणि म्हणूनच मी प्रेक्षकांनी हा सिनेमा अनुभवण्याची आतुरतेने वाट पाहतो आहे." लव फिल्म्स प्रस्तुत, "देवमाणूस" या चित्रपटाचे दिग्दर्शन तेजस प्रभा विजय देऊस्कर ह्यांनी केले आहे लव रंजन आणि अंकुर गर्ग निर्मित आहे. हा चित्रपट २५ एप्रिल २०२५ रोजी आपल्या जवळच्या चित्रपटगृहांमध्ये रिलीज होणार आहे.

# सोसायटीची निवडणूक बिनविरोध करण्यात प्रशांत काळभोर यांना यश

## ५० वर्षानंतर बिनविरोध निवडणूक



### बिनविरोध निवडून आलेल्या सभासदांची नावे पुढीलप्रमाणे

रमेश यशवंत भोसले (सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी), बाळासाहेब जयवंत काळभोर, राहुल दत्तात्रय काळभोर, गुरुदेव दत्तात्रय काळभोर, सागर बाळासो काळभोर, संजय लक्ष्मण काळभोर, बाळासाहेब पर्वतराव काळभोर, सचिन मुरलीधर काळभोर (सर्वसाधारण खातेदार कर्जदार प्रतिनिधी), राजश्री उदय काळभोर (महिला प्रतिनिधी), वर्षा मयूर काळभोर, (महिला प्रतिनिधी) संजय भिमराव भालेराव (अनुसूचित जाती/ जमाती), हेमंत गंगाराम गायकवाड (इतर मागास प्रवर्ग) व अमोल सिदु कोळपे (वि.जा/भ.ज.वि.मा.प्र)




**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

लोणी काळभोर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची निवडणूक कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर यांना बिनविरोध करण्यात यश आले असुन त्यांच्या नेतृत्वाखाली ५० वर्षानंतर सोसायटीची निवडणूक बिनविरोध झाली आहे.

लोणी काळभोर येथे १९७१ साली विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची स्थापन काही शेतकऱ्यांनी एकत्र येऊन केली. या संस्थेच्या माध्यमातून भरीव कर्जवाटप, पिककर्ज आणि रासायनिक खतांची विक्री अशा स्वरुपाचे भरमसाठ कामे चालू असुन या संस्थेची निवडणूक प्रक्रिया २०२४-२०२५ते२०२८-२०२९ या कालावधीसाठी जाहीर करण्यात आली होती.

लोणी काळभोर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेची निवडणूक प्रक्रियेत १३ जागांसाठी एकूण २६ अर्ज आले होते. त्यामुळे ही निवडणूक चुरशीची होणार असल्याची चर्चा पुणे जिल्ह्यात रंगली होती. परंतु २६ पैकी १३ जणांनी उमेदवारी अर्ज माघारी घेतले त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाल्याचे सहकार विभागाच्या सहाय्यक सहकारी अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सोनाली देसाई यांनी घोषित केले.

ही निवडणूक प्रक्रिया प्रत्यक्षात लोणी काळभोर येथील संस्थेच्या कार्यालयात शुक्रवारी (ता. १४) पार पडली.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर यांच्या नेतृत्वाखालील सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आले आहे. प्रशांत काळभोर यांनी सर्व उमेदवारांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सर्व कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण व फटाक्यांची आतिषबाजी करून मोठा जल्लोष साजरा केला. तर ५० वर्षानंतर निवडणूक प्रक्रिया बिनविरोध करण्यासाठी प्रशांत काळभोर यांनी महत्वाची भूमिका पार पाडली आहे. पुणे जिल्हात ज्या काही मोजक्या विकास सोसायटया नफ्यात आहेत त्यापैकी लोणी विकास सोसायटी अग्रगण्य आहे.

# पळशी आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका अखेर निलंबित...!

**पारनेर (दै. आरंभ पर्व)**

पारनेर तालुक्यातील पळशी येथील ग्रामीण भागातील आदिवासी मुला-मुलींसाठी असणाऱ्या निवासी आश्रम शाळेत विविध गैरप्रकार सुरू होते. चाललेल्या या गैरप्रकाराबाबत हिवाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्यावर आमदार काशिनाथ दाते यांनी या आश्रम शाळेविषयी चाललेल्या गैरप्रकारांची चौकशी करून दोषींवर तात्काळ कारवाई करावी अशी मागणी केली होती.

या प्रकरणाविषयी शासनामार्फत समिती स्थापन करून शासनाला अहवाल देण्यात आला यामध्ये शाळेच्या मुख्याध्यापिका या दोषी आढळल्याने आश्रम शाळेच्या मुख्याध्यापिका सविता कुंडलिक नागरगोजे यांचे निलंबन करण्यात आले आहे.

### कसूर केल्यास कारवाई

**पळशी येथील आश्रम शाळेतील गैरप्रकारांबाबत हिवाळी अधिवेशनात औचित्याच्या त्याच्या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित करून विद्यार्थ्यांसाठी पाण्याची व्यवस्था, मुलांना खाण्यासाठी आणलेले फळे पालेभाज्या हे खराब असून मुलांचे आरोग्य धोक्यात असल्याचे सरकारच्या निदर्शनास आणून दिले. या प्रकाराबाबत स्थापन केलेल्या समितीकडून सरकारला अहवाल सादर करण्यात आला यामध्ये मुख्याध्यापिकेने गैरकारभार केल्याचे निष्पन्न झाल्यावर त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. याचबरोबर इतर विभागाचे अधिकाऱ्यांनी कामकाजाविषयी कसूर केल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात येईल.**

**आमदार - काशिनाथ दाते सर**

# ऑनलाइन घोटाळ्यांपासून सावधान!

- **सतर्कतेचा इशारा द्यायला येतोय 'फ्रॉम चायना विथ लव्ह'**
- **अनिकेत वाघ दिग्दर्शित, अभिनीत ऑनलाइन फ्रॉडपासून वाचवायला सज्ज झालाय 'फ्रॉम चायना विथ लव्ह'**
- **फ्रॉम चायना विथ लव्ह' या ऑनलाइन घोटाळ्यापासून सावधान करणाऱ्या चित्रपटाचा ट्रेलर समोर**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सध्या ऑनलाइन घोटाळ्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले आहे. घोटाळेबाज फसवणुकीसाठी नवनवीन युक्त्या वापरत आहेत. ऑनलाइन खरेदीकडे लोकांचा वाढता कल बघता, घोटाळेबाज ऑनलाइन ग्राहकांची फसवणूक करण्यासाठी नवनवीन युक्त्या शोधत आहेत. या घोटाळ्यांमुळे अनेकांची बँक खातीदेखील रिकामी झाली आहेत. हे सायबर चोरटे लोकांचा पैसा लुटण्यासाठी वेगवेगळी तंत्रे अवलंबताना दिसतात. सायबर चोरट्यांच्या यूपीआय घोटाळ्याने नागरिकांची डोकेदुखी वाढवली आहे. अनेकांची घरं उध्वस्त झाली आहेत. या सर्व प्रकारात जेव्हा सर्वसामान्य नागरिक अडकतो तेव्हा तो याचा नेमका कसा सामना करतो याचं उत्तम उदाहरण म्हणजे फ्रॉम चायना विथ लव्ह हा चित्रपट होय. नुकताच 'फ्रॉम चायना विथ लव्ह या चित्रपटाचा ट्रेलर लॉंच सोहळा पुण्यात अगदी दणक्यात साजरा झाला. यावेळी चित्रपटाची संपूर्ण टीम उपस्थित होती. हा सिनेमा आजपर्यंत भारतातील कुठल्याच भाषेतील फिल्म इंडस्ट्री बोलू शकली नाही अशा विषयावर भाष्य करतो. online money fraud सध्याचं एक अदृश्य चक्रव्यूह आहे. ज्यात माणूस खूप सहजतेने अडकतो पण त्यातून बाहेर येण्याचा मार्ग काही त्याला सापडत नाही. एखादी सर्वसामान्य व्यक्ती जेव्हा या सगळ्यात अडकते तेव्हा काय काय घडतं आणि ते तुमच्या सोबत घडू नये असं वाटत असेल तर हा सिनेमा आवर्जून पाहायला हवा.'अनिकेत वाघ क्रिएशन' अंतर्गत बनलेल्या या चित्रपटाचे दिग्दर्शन,अभिनय,लेखन आणि निर्माता अशी चौफेर धुरा अनिकेत वाघ यानी उत्तमरित्या सांभाळली आहे. अनिकेत वाघसह चित्रपटात अंकुश मांडेकर,सिद्धेश्वर झाडबुके, गायत्री बनसोडे, सोनाली भांगे, निलेश होले, प्रसाद खेडकर ही कलाकारांची फौज पाहायला मिळतेय. तर चित्रपटाच्या संगीताची जबाबदारी प्रशांत फासगे यांनी सांभाळली आहे. तसेच चित्रपटाचे शीर्षक गीत कश्मिरा खोत हिने स्वरबद्ध केले आहे. तुम्हाला या ऑनलाइन फ्रॉडमध्ये अडकायचे नसल्यास नेमक काय करावं हे पाहण्यासाठी येत्या २८ फेब्रुवारी २०२५ ला जवळच्या चित्रपटगृहात जाऊन नक्की पाहा "फ्रॉम चायना विथ लव्ह".

# 'व्हीकलेक्टिव्ह-बिल्डिंग द सिटी वि कॉल होम' प्रदर्शन व शहरीकरणावर चर्चासत्र

- **पुणेकरांना अनुभवता येणार व्हीके ग्रुपच्या पाच दशकांतील विविध प्रकल्पांच्या डिझाईनचा संग्रह**
- **आर्कि. हृषीकेश कुलकर्णी यांची माहिती; शहराच्या स्मार्ट व शाश्वत विकासावर होणार विचारमंथन**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आर्किटेक्चर, एन्व्हायर्नमेंट, इंटेरियर डिझाईन, टाऊन प्लॅनिंग व अर्बन डिझाईन क्षेत्रात कार्यरत पुण्यातील व्हीके ग्रुपच्या वतीने ५१ व्या वर्षपूर्तीनिमित्त 'व्हीकलेक्टिव्ह-बिल्डिंग द सिटी वि कॉल होम' या तीन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. गेल्या ५० वर्षांतील आकर्षक, नाविन्यपूर्ण व वास्तुकलेच्या डिझाईन्स व प्रकल्पाच्या संग्रहाचे प्रदर्शन पुणेकरांना अनुभवता येणार आहे. दि. २१, २२, २३ फेब्रुवारी २०२५ या दिवशी हे प्रदर्शन पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्र, घोले रोड पुणे येथे सर्व पुणेकरांसाठी विनामूल्ये खुले असणार आहे, अशी माहिती व्हीके ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक आर्कि. हृषीकेश कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. त्याचबरोबर 'पुणे आणि शहरीकरण' याविषयी अनेक तज्ज्ञ मान्यवरांच्या चर्चासत्र, कार्यशाळांचे आयोजन केले आहे.

याप्रसंगी व्हीके ग्रुपचे संस्थापक आर्कि. विश्वास कुलकर्णी, संचालिका आर्कि. अनघा पुरोहित-परांजपे, संचालिका सौ. अपूर्वा कुलकर्णी व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. या प्रदर्शनाला अधिकाधिक पुणेकरांनी, विद्यार्थ्यांनी, युवा व्यावसायिकांनी भेट देऊन वास्तुकलेचा आविष्कार अनुभवावा, अशी विनंती संयोजकांनी केली आहे.

आर्कि. हृषीकेश कुलकर्णी म्हणाले, "व्हीके ग्रुपने आजवर दगडूशेठ गणपती मंदिरापासून ते सौदी अरेबियातील 'द लाईन' मेट्रोसिटी, लोणावळ्यातील ग्रीन बटरफ्लाय हिलस्टेशनपासून नाशिकमधील ग्रेप कंट्री रिसॉर्ट आणि पुण्यासह देशविदेशात अनेक टाऊनशिप्स, सरकारी प्रकल्पाच्या युनिक डिझाईन्स साकारल्या आहेत. या सर्व डिझाईन्स या प्रदर्शनात पाहता येणार आहेत. या प्रदर्शनाचे उद्घाटन येत्या शुक्रवारी (दि. २१) दुपारी ३ वाजता राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी राज्याच्या नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि शिवाजीनगरचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती राहणार असून, ते आपले विचार मांडणार आहेत."

"उद्घाटन सोहळ्यावेळी पुण्याचे शहरीकरण व विकासाचे विविध पैलू यामध्ये महत्वाचे योगदान देणाऱ्या संस्थांना 'लीडर्स ऑफ चेंज' म्हणून सन्मानित करण्यात येणार आहे. यामध्ये पुण्यातील मॉडेल समजले जाणारे मगरपट्टा सिटी कॉर्पोरेशनचे अध्यक्ष सतीश मगर, १२५ हुन अधिक वर्षांचा शैक्षणिक वारसा असलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रमोद रावत, पुण्यातील प्रसिद्ध पीएनजी ज्वेलर्सचे व्यवस्थापकीय संचालक सौरभ गाडगीळ, पुण्यातील सांस्कृतिक प्रतीक सवाई गंधर्व या वार्षिक उत्सवाचे संचालक मुकुंद संगोराम यांना निमंत्रित केले आहे. त्यानंतर होणाऱ्या 'बिल्डिंग द सिटी ऑफ टुमारो' या विषयावरील चर्चासत्रात 'क्रेडाई'चे अध्यक्ष रणजित नाईकनवरे, सर जेजे कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचे प्राचार्य राजीव मिश्रा, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्सच्या पुणे चॅप्टरचे चेअरमन विकास अचलकर आपले विचार मांडणार आहेत.

# पारंपरिक ज्ञानशाखांच्या पुनरुज्जीवनासाठी प्रयत्न व्हावेत : राज्यसभा प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी

- **वैद्य खडीवाले संस्थेच्या पुरस्कारांचे वितरण**
- **वैद्य प्रशांत बागेवाडीकर यांना 'महर्षी अण्णासाहेब पटवर्धन वैद्यकीय पुरस्कार' प्रदान**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"आपल्या पारंपरिक ज्ञानशाखांच्या पुनरुज्जीवनासाठी आपणच प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी पुढाकार घेऊन जागतिक पातळीवर त्याचे मार्केटिंग केले पाहिजे", असे प्रतिपादन राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी केले. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारकडून आयुर्वेदाला लोकाभिमुख करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

वैद्य खडीवाले वैद्यक संशोधन संस्थेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांचे वितरण प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते रविवारी झाले. एरंडवण्यातील धन्वंतरी सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात सोलापूर येथील वैद्य प्रशांत बागेवाडीकर यांना 'महर्षी अण्णासाहेब पटवर्धन वैद्यकीय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वैद्य विनायक प. खडीवाले, पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष वैद्य स. प्र. सरदेशमुख, सचिव वैद्य योगेश व. गोडबोले, विश्वस्त वैद्य संगीता खडीवाले, विश्वस्त वैद्य निखिल खडीवाले, विश्वस्त वैद्य विवेक साने, विश्वस्त जयश्री टाव्हरे आदी उपस्थित होते.

समारंभात वैद्य पुरुषोत्तम शास्त्री नानल चरक पुरस्कार पुण्यातील वैद्य गुणवंत येवला, वैद्य द. वा. शेंडे रसौषधी पुरस्कार पुण्यातील वैद्या विशाखा बाक्रे, वैद्य वि. म. गोगटे वनौषधी पुरस्कार नाशिकच्या वैद्य अर्चना भास्करवार, वैद्य आचार्य यादवजी त्रिकमजी ग्रंथ पुरस्कार सांगलीतील वैद्य अनिरुध्द कुलकर्णी व वैद्य अमृता जोशी, वैद्य बाळशास्त्री लावगनकर पंचकर्म पुरस्कार नागपूरच्या वैद्य सचिन चंडालिया, वैद्य बापूराव पटवर्धन सुश्रुत पुरस्कार वर्ध्यातील वैद्य शीतल आसुटकर, वैद्य भा. गो. घाणेकर अध्यापन पुरस्कार गोव्यातील वैद्या अरुणा बाले, वैद्य मा. वा. कोल्हटकर संशोधन पुरस्कार मुंबईतील वैद्या कल्पना धुरी, वैद्या लक्ष्मीबाई बोरवणकर स्त्री वैद्या पुरस्कार पुण्यातील वैद्या हेमलता जळगावकर, वैद्य शंकर दाजीशास्त्री पदे कार्यकर्ता पुरस्कार पुण्यातील वैद्य मनिष जोशी, पूज्य पादाचार्य रचनात्मक कार्य पुरस्कार पुण्यातील वैद्य जय ताम्हाणे व डॉ. वा. द.वर्तक वनमित्र पुरस्कार रघुनाथ ढोले यांना प्रदान करण्यात आला. २१ हजार रोख रक्कम व मानपत्र देऊन या वैद्यांना सन्मानित करण्यात आले.

प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, "आयुर्वेदाला आता चांगले दिवस आले आहेत. इतकी वर्षे आपल्या पारंपरिक ज्ञानशाखांकडे दुर्लक्ष झाले होते. त्यामुळे प्राचीन संशोधन, प्रयोग जे अनुभवांतून सिद्ध झाले होते, तेही मागे पडले. त्यांना वाव मिळाला नाही. आता मात्र परिस्थिती अनुकूल आहे. त्यामुळे आयुर्वेद तज्ज्ञांनी अन्य पॅथींसह कुठे सहकार्य करणे शक्य आहे, याचा विचार करावा. परस्परांसह चर्चा, संवाद साधावा. ज्याद्वारे पारंपरिक ज्ञानशाखांचे आधुनिक काळातील पुनरुज्जीवन शक्य होईल."

वैद्य प्रशांत बागेवाडीकर म्हणाले, "आज आयुर्वेदाला कधी नव्हता इतका अनुकूल काळ दिसत आहे. आयुर्वेदासाठी आपल्या आधीच्या पिढ्यांनी अतोनात संघर्ष आणि परिश्रम घेतले आहेत. त्यांचे ऋण मान्य केले पाहिजे. आयुर्वेदिक रसशास्त्रातील औषधे वापरू नका, हा अपप्रचार थांबवला पाहिजे. आपल्या ज्ञानाचा प्रसार, प्रचार करण्याची जबाबदारी आपलीच आहे. त्यातूनच आयुर्वेद जागतिक स्तरावर जाईल."

प्रास्ताविकात वैद्य विनायक खडीवाले म्हणाले, "पुरस्काराचे हे ४० वे वर्ष आहे. आयुर्वेद क्षेत्रात जे समाजासाठी चांगले, सकारात्मक कार्य करीत आहेत, त्यांचे कौतुक, त्यांच्या कार्याची माहिती इतरांपर्यंत पोहोचावी आणि त्यांच्या कार्यापासून इतरांना प्रेरणा मिळावी, या हेतूने वैद्य दादा खडीवाले यांनी याची सुरुवात केली."

पुरस्कारप्राप्त सर्व वैद्यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांच्या हस्ते श्रीकृष्ण चितळे यांचा अमृत महोत्सवानिमित्त सत्कार करण्यात आला. वैद्य संगीता खडीवाले यांनी सूत्रसंचालन केले.

# पुण्याच्या लक्झरी रिअल इस्टेटमध्ये मार्व्हल रिअल्टर्सची महत्त्वाकांक्षी योजना

## तीन ते चार वर्षांत १,८०० पेक्षा अधिक युनिट्स वितरित करणार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नाविन्यपूर्ण आर्किटेक्चरल डिझाईनच्या माध्यमातून लक्झरी जीवनशैलीचा नवा अर्थ मांडणाऱ्या मार्व्हल रिअल्टर्सची ओळख पुण्यातील लक्झरी रिअल इस्टेट क्षेत्रातील अग्रणी म्हणून आहे. पुण्याच्या विकसित होत असलेल्या बाजारपेठेसाठी कंपनीने महत्त्वाकांक्षी योजना आखली असून पुढील तीन ते चार वर्षांत १,८०० पेक्षा अधिक युनिट्स वितरित करण्याची मार्व्हल रिअल्टर्सचे नियोजन आहे.

उत्कृष्टतेची आपली परंपरा पुढे चालू ठेवत मार्व्हल रिअल्टर्स कोरेगाव पार्क, बोट क्लब रोड, विमान नगर, खराडी, हडपसर, मगरपट्टा, बावधन आणि वाघोली येथे प्रीमियम निवासी आणि व्यावसायिक प्रकल्पांची मालिका सुरू करण्यास सज्ज झाली आहे. या प्रकल्पांमुळे उच्च दर्जाच्या राहणीमानात नवीन मापदंड स्थापित होणार असून भव्य लेआउटसह घरे, पूर्णपणे सुसज्ज लक्झरी अपार्टमेंट आणि उत्कृष्ट सुविधा उपलब्ध होणार आहेत. तसेच लक्झरी रिअल इस्टेट मार्केटमध्ये त्यांचे नेतृत्व आणखी मजबूत होईल.

बाजारपेठेतील वाढती मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने पूर्णपणे सुसज्ज स्टुडिओ अपार्टमेंट्स आणि प्रीमियम टचसह रेडी-टू-मूव्ह-इन युनिट्स सादर करण्याची मार्व्हल रिअल्टर्सची योजना आहे. यामध्ये इन-हाऊस स्पा, सलून, गॉरमेट शेफ आणि वॉलेट सेवांसह अन्य विशेष सेवाही असतील. त्यामुळे लक्झरी आणि सोयींचा अनोखा मिलाफ होणार आहे.

आपले ध्येय अधोरेखित करताना मार्व्हल रिअल्टर्सचे व्यवस्थापकीय संचालक. विश्वजीत झवर म्हणाले, मानवी अनुभव समृद्ध करणाऱ्या राहण्याच्या जागा तयार करणे हे आमचे नेहमीच ध्येय राहिले आहे. डिझाईनमधील नाविन्यपूर्णता, शाश्वतता आणि स्मार्ट लिव्हिंग सोल्यूशन्स यांना एकत्र आणून अतुलनीय गुणवत्ता प्रदान करण्यासाठी आणि शहरी जीवनशैलीला नवा अर्थ मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

कंपनीने आतापर्यंत ५० हून अधिक प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केले आहेत. यामध्ये ४५० हून अधिक इमारती आणि ९,००० अपार्टमेंटचा समावेश असून २७ दशलक्ष चौरस फूट विकसित जमिनीचा समावेश आहे. डिझाईनमधील उत्कृष्टता, नावीन्य आणि शाश्वततेसाठी अखंड समर्पणाने मार्व्हल रिअल्टर्स आधुनिक जीवनशैलीच्या कक्षा रूंदावत आहे.

मार्व्हल रिअल्टर्सने सातत्याने पुण्यातील काही प्रमुख ठिकाणी अत्यंत प्रतिष्ठेचे लक्झरी प्रकल्प पूर्ण केले आहेत. कंपनीने वाघोली येथील मार्व्हल फ्रिया आणि विमाननगर येथील मार्व्हल पियाझा यांसारखे प्रकल्प अलीकडेच पूर्ण केले आहेत. गुणवत्ता, सुविधा आणि लँडस्केपिंगमध्ये अपेक्षेपेक्षा जास्त कामगिरी करण्यासाठी कंपनीची कटिबद्धता त्यातून व्यक्त झाली आहे. बोट क्लब रोडवरील मार्व्हल रिबेरा, मगरपट्टा येथील मार्व्हल बाउंटी, एनआयबीएम रोडवरील मार्व्हल आयसोला आणि खराडी येथील मार्व्हल ॲक्वानस यासारखे उच्च दर्जाचे प्रकल्प पुढील तीन ते सहा महिन्यांत पूर्ण होणार आहेत.




रिअल इस्टेट क्षेत्रात प्रगत नवकल्पना आणणारी अग्रणी कंपनी म्हणून मार्व्हल रिअल्टर्सने होम ऑटोमेशन, डबल-हाईट बाल्कनी, आयात केलेले संगमरवरी फ्लोअरिंग, वैयक्तिक स्टीम शॉवर आणि खाजगी पूल यासारख्या वैशिष्ट्यांसह नवीन मापदंड स्थापित केले आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाच्या वैशिष्ट्यांचा वापर करून आधुनिक राहणीमानाच्या अनुभवांमध्ये क्रांती घडवून आणण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

शाश्वततेवर कंपनीने लक्ष केंद्रित केल्यामुळे ऊर्जा-कार्यक्षम इमारती, व्यापक हिरवे लँडस्केपिंग आणि अक्षय ऊर्जा एकत्रीकरणावर कंपनीने भर दिला आहे. मार्व्हल रिअल्टर्सने प्लॅटिनम-ग्रीन प्रमाणपत्रासाठी पाठपुरावा केलेला असून पर्यावरणीयदृष्ट्या जबाबदार विकासावरील त्यांची निष्ठा त्यातून अधोरेखित होते.

नवोन्मेष आणि शाश्वततेवर लक्ष केंद्रित करून मार्व्हल रिअल्टर्सने चोखंदळ घरमालकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करणारे कालातीत, डिझाइन-चालित प्रकल्प सादर केले आहेत. त्यामुळेच रिअल इस्टेट क्षेत्रात ती आघाडीवर आहे.

मार्व्हल रिअल्टर्स केवळ घरे बांधत नाहीयेत तर पुण्यातील लक्झरी राहणीमानाचे भविष्य घडवत आहेत. उत्कृष्ट इतिहास, दर्जाशी कोणतीही तडजोड न करणे आणि दूरदर्शी दृष्टिकोन यामुळे कंपनी रिअल इस्टेट उद्योगात आघाडीवर आहे. आपल्या वाढीच्या पुढच्या टप्प्यात प्रवेश करत असताना, परिवर्तनकारी अनुभव, अपवादात्मक गुणवत्ता आणि ग्राहक-केंद्रित उपाय प्रदान करण्यावर मार्व्हल रिअल्टर्स लक्ष केंद्रित करत आहे.

# थोडक्यात




## यजमान सेंट व्हिन्सेंट एचएस विजेता; सेंट व्हिन्सेंट ज्युनियर फुटबॉल लीग

पुणे (आरंभ पर्व) : यजमान सेंट व्हिन्सेंट एचएसने सेंट व्हिन्सेंट ज्युनियर लीग 2024-25 फुटबॉल स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत , सेंट व्हिन्सेंटने हिलग्रीनचा 3-1 असा पराभव करत एकूण दहावा विजय मिळवला आणि सहा आठवड्यांच्या स्पर्धेत 31 गुणांसह (13 सामने) अव्वल स्थानी झेप घेतली. त्याचप्रमाणे दस्तूर बॉईजविरुद्धचा शेवटचा सामना 2-0 असा जिंकणाऱ्या विद्या व्हॅलीने 29 गुणांसह (13 सामने) दुसरे स्थान मिळवले. विद्या व्हॅलीच्या तुलनेत कमी गोल फरकामुळे लोयोला एचएसला (२९ गुण) तिसरे स्थान मिळाले. हचिंग्ज संघ (२६ गुण) चौथ्या स्थानावर आहे. लीगच्या शेवटच्या दिवशी, सेंट व्हिन्सेंटला लीग जिंकण्यासाठी विजयाची गरज असताना ॲन्विक लोबो (2) आणि जेवंश व्यास यांच्या (1) सुरेख कामगिरीमुळे हिलग्रीनवर 3-1 अशी मात केली. हिलग्रीनकडून एकमेव गोल ओम शिवरकरने गोल केला. या विजयामुळे सेंट व्हिन्सेंटची विजयाची संख्या 10 वर गेली. लीगमधील हे सर्वाधिक विजय आहेत. या व्यतिरिक्त 2 पराभव आणि 1 ड्रॉ त्यांच्या नावे आहेत. शेवटच्या फेरीत ( पाचवा आठवडा) द कल्याणी स्कूल, यजमान सेंट व्हिन्सेंट एचएस आणि विद्या व्हॅली संघांनी विजयी कामगिरीमध्ये सातत्य राखताना टॉप-4 संघांमध्ये स्थान कायम राखले.



## होंडा बिगविंग बाणेरच्या प्रीमियम शोरूमचे भव्य उद्घाटन

पुणे (आरंभ पर्व) : शहरातील दुचाकीप्रेमींसाठी मोठी आनंदाची बातमी आहे! होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया च्या प्रीमियम विभागाने बाणेर येथे बिगविंग शोरूमचे भव्य उद्घाटन विक्री आणि विपणन विभागाचे संचालक योगेश माथूर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी होंडा इंडिया डायरेक्ट ऑपरेशन हेड तसेच विविध विभागातील टीम, झोनल इन्चार्ज अय्यर सॅन, पुणे विभागाचे एरिया इन्चार्ज वेदांत सॅन, पाषाणकर ऑटो टीम तसेच पाषाणकर ऑटो चे कार्यकारी संचालक सूरज गिरमे, सर्व विभागाचे प्रमुख रवी गारगोटे तसेच प्रवीण रहाटे, रवी जगधने, सर्विस नेटवर्क टीम तसेच पाषाणकर होंडा बिगविंग पुणे ईस्टचे हेड राकेश स्वामी, बाणेर सेल्स मॅनेजर निलेश पांडे, यश लडकत, जे एम रोड बिग विंग प्रसाद पाटुकले आदी उपस्थित होते. या शोरूमच्या माध्यमातून प्रीमियम बाइक खरेदीदारांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा आणि सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ग्राहकांना होंडाच्या विविध उच्च प्रतीच्या दुचाकींचा संपूर्ण पोर्टफोलिओ येथे अनुभवता येणार आहे. या नवीन शोरूममध्ये सुपरबाइक्स, ॲडव्हेंचर बाइक्स आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज असलेल्या दुचाकींचे प्रदर्शन करण्यात आले आहे. तसेच, ग्राहकांसाठी टेस्ट राइड, कस्टमायझेशन पर्याय आणि विक्रीपश्चात उत्कृष्ट सेवा उपलब्ध आहेत. होंडा बिगविंग बाणेरने ग्राहकांच्या सोयीसाठी विक्री, सेवा आणि स्पेअर पार्ट्स यांची संपूर्ण व्यवस्था केली असून, बाणेर आणि परिसरातील बाईकप्रेमींसाठी हे एक उत्कृष्ट केंद्र ठरणार आहे. या नव्या शोरूममुळे प्रीमियम मोटरसायकल खरेदी आणि सेवांबाबत ग्राहकांचा अनुभव अधिक सुलभ आणि समृद्ध होणार असल्याचे प्रतिपादन प्रमुख योगेश माथूर यांनी केले. तसेच, होंडाने या विशेष निमित्ताने ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स आणि प्रोत्साहन योजना देखील जाहीर केल्या आहेत.

### पद्मावती ज्येष्ठ नागरिक संघाच्या ६व्या वर्धापनदिनानिम्मित

# ५०० ज्येष्ठ नागरिकांना आयुष्यमान भारत कार्डचे वितरण

## किशोरभाऊ पोकळे मित्र परिवारातर्फे आयोजन



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

शुक्रवार १४ फेब्रुवारी रोजी धायरीतील पद्मावती जेष्ठ नागरिक संघाच्या 6 व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

माजी नगरसेविका अश्विनी किशोर पोकळे, पद्मावती मंडळ अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते किशोरभाऊ पोकळे यांच्या प्रयत्नातून 500 जेष्ठ नागरिकांना आयुष्यमान भारत कार्डचे मोफत वाटप करण्यात आले. ह्यावेळी ज्येष्ठ नागरिकांना तणावमुक्त जीवन जगण्यासाठी प्रसिद्ध माइंड पॉवर सेंटरचे मा. डॉ. दत्ता कोहिनकर यांचे व्याख्यान पार पडले. ह्यातून चांगल्या प्रकारचे प्रबोधन झाले.

अतिशय सुंदर व्याख्यानाने जेष्ठ नागरिकांना भविष्यात याचा लाभ होणार आहे. या कार्यक्रमास माजी नगरसेविका अश्विनी पोकळे, सामाजिक कार्यकर्ते किशोर भाऊ पोकळे, पद्मावती ज्येष्ठ नागरिक संघ अध्यक्ष दत्तात्रय पोकळे, दिलीप देशपांडे , राज शिरोडकर, तेजस्विनी शिरोडकर, प्रतिक मते, सोनू माहूर , सलोनी घोडके यांच्यासह ज्येष्ठ नागरिक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सायंकाळी पाच वाजता झालेल्या या कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिकांची मोठी गर्दी होती.

माजी नगरसेविका अश्विनी पोकळे व किशोरभाऊ पोकळे यांनी आजवर ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम राबवले आहेत. विविध सहली, आरोग्य तपासणी शिबिरे यांचा हजारो नागरिकांना लाभ झाला आहे.

ह्या शिवाय शेकडो नागरिकांची नेत्र शस्त्रक्रिया ही पार पडली आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी पोकळे दाम्पत्यांनी केलेल्या कामाबद्दल उपस्थित आणि कौतुक केले.



### जनसेवा हेच कर्तव्य: किशोर पोकळे

**पूर्वीपासूनच जनसेवेला प्राधान्य देत आलो आहोत. ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध उपक्रम राबवण्याचा आपला प्रयत्न नेहमीच असतो. त्यांच्यासाठी 500 आयुष्मान भारत कार्ड चे वितरण करण्यात आले. यापुढेही आणखी त्यांच्यासाठी काम करण्याचा मानस आहे. ज्येष्ठाच्या सेवेतून मोठा आशीर्वाद मिळत असल्याची प्रतिक्रिया सामाजिक कार्यकर्ते, किशोरभाऊ पोकळे यांनी दिली.**

# एसआयटी नेमण्याची आंबेडकरी चळवळीतील नेत्यांची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भोर तालुक्यातील घोडदरी येथे विक्रम गायकवाड या बौद्ध युवकाची निर्घृन हत्या करण्यात आहे. सदर गुन्हा हा ऑनर किलिंग च्या अनुषंगाने घडलेला असल्याने त्या दिशेने तपास व्हावा व यासाठी स्थानिक पोलिसांचे काम समाधानकारक नसल्याने पोलीस अधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक अर्थात एस आय डी ची स्थापना करावी अशी मागणी आज आंबेडकरी चळवळीतील नेत्यांच्या वतीने समाज कल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरिया तसेच पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र दूडी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. सदर शिष्टमंडळामध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे राज्य संघटन सचिव परशुराम वाडेकर, पुणे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर डॉ. सिद्धार्थ देंडे, रिपब्लिकन युवा मोर्चाचे राहुल डंबाळे यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते. पुण्यासारख्या जिल्ह्यामध्ये ऑनर किलिंग ची घटना ही अत्यंत निंदनीय असून अशा प्रकारच्या घटनांना पायबंध करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात प्रशासनाने स्वतःहून तात्काळ कारवाई करणे आवश्यक असताना ते न करता तपास वेगळ्या दिशेला घेऊन जाण्याचा प्रयत्न स्थानिक पोलिसांकडून होत असल्याचा गंभीर आरोप यावेळी शिष्टमंडळाकडून करण्यात आला.

# शिवजयंतीनिमित्त शिवराज्य समूहातर्फे नऱ्हेत विविध कार्यक्रमाचे आयोजन

## लक्ष्मण साबळे

- **रक्तदान शिबिर, होम मिनिस्टर, कार्यक्रमासह भव्य दिव्य मिरवणूक निघणार : भूपेंद्र मोरे**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त शिवराज्य समूह पुणे यांच्यातर्फे नऱ्हे येथे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष भूपेंद्र मोरे यांनी दिली.

शिवराज्य समूहातर्फे सालाबादप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीच्या आयोजन करण्यात येते.

ह्यावर्षी मंगळवार 18 फेब्रुवारी रोजी सकाळी 8ते सायंकाळी 6 पर्यंत राजलक्ष्मी आयकॉन येथे भव्य रक्तदान शिबिर आयोजन करण्यात आले आहे. दिनांक 19फेब्रुवारी रोजी सायंकाळी 4 वाजता भव्य दिव्य मिरवणूक निघणार आहे. ही मिरवणूक अभिरुची मॉल, धायरी फाटा , लाडली गोकुळ नगर ते राजलक्ष्मी आयकॉन ह्या मार्गे निघणार आहे. दिनांक 20 फेब्रुवारी रोजी सायंकाळी पाच वाजता राजलक्ष्मी आयकॉन येथे महिला भगिनींसाठी होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विविध बक्षिसे देण्यात येणार आहेत.

लकी ड्रॉ ही काढण्यात येणार आहे. ह्या सर्व कार्यक्रमांना आपण शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री .भूपेंद्र मोरे आणि शिवराज्य समूहाने केले आहे. शिवराज्य समूहाच्या शिवजयंती उत्सवास चांगला प्रतिसाद मिळत असतो. याही वर्षी तो प्रतिसाद मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. शिवराज्य समूहाची स्वागत कमान लक्षवेधी

शिवराज्य समूहातर्फे गोकुळ नगर येथे शिवजयंती उत्सवानिमित्त भव्य दिव्य कमान लावण्यात आली आहे. छत्रपती शिवाजीराजांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला.. हा प्रसंग मध्यभागी कमानीवर लक्ष वेधत आहे. ह्या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना छत्रपती शिवाजी महाराजांची स्फूर्ती या निमित्त मिळत आहे.

# कॉमिक कॉन इंडिया प्रस्तुत 'कॉसप्ले १०१ कार्यशाळा' – १६ फेब्रुवारीला!

## पुण्यात पॉप-कल्चरचा महोत्सव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मारुती सुझुकी अरीना कोलकाता कॉमिक कॉन 2025, क्रंचीरोल यांच्या संयुक्त विद्यमाने "वार्षिक कॉसप्ले 101 कार्यशाळा " सादर करत आहे, जिथे सर्जनशीलता, कौशल्य आणि फँडम एकत्र येऊन भारतीय चाहत्यांसाठी पॉप-कल्चरचा उत्सव साजरा केला जातो. ही कार्यशाळा म्हणजे कॉसप्लेर्स(आपल्या आवडत्या पात्राप्रमाणे वेशभूषा करणारे कलाकार), हौशी कलाकार आणि नवशिक्यांसाठी एक अनोखा मंच आहे, जिथे ते ॲनिमे, मंगा, कॉमिक्स आणि त्यापलीकडील मनोरंजन विश्वात डोकावू शकतात.

या वर्षीच्या कार्यशाळेमध्ये खालील प्रतिष्ठित कॉसप्ले तज्ञ सहभागी होणार आहेत:

1. सौरभ सिंग रावत (@ metalbenderstudios) – 2024 इंडियन कॉसप्ले चॅम्पियन, एक प्रतिभावान कलाकार आणि माजी कला दिग्दर्शक, ज्यांना दूरचित्रवाणी उद्योगात तब्बल दहा वर्षांचा अनुभव आहे. सध्या त्यांचा स्वतःचा स्टुडिओ असून, कलाकुसरीचे क्लिष्ट पोशाख आणि खास अभिनयासाठी वापरण्यात येणारे पोशाख तयार करतात. त्यांनी युबिसॉफ्टसारख्या आंतरराष्ट्रीय ब्रँड्ससोबत देखील काम केले आहे.
2. शेख समीर कलीम (@ thereapersam_ohoo) – महाराष्ट्रातील लातूर येथील एक मेहनती कॉसप्लेयर, जे 2018 पासून उत्कृष्ट फोम-आधारित पोशाख आणि खास अभिनयासाठी वापरण्यात येणारे पोशाख तयार करतात. 2020, 2023, 2024 सालच्या इंडियन कॉसप्ले चॅम्पियनशिपसाठी पात्र(क्वालिफायर) राहिलेले आहेत आणि पीजीएएक्स 2019 च्या चेन्नई स्पर्धेचे विजेता. समीर यांनी आजवर 17 हून अधिक कॉसप्ले स्पर्धा जिंकल्या आहेत आणि अनेक प्रसिद्ध ब्रँड्ससोबत काम केले आहे.
3. स्वाती मेस्त्री (@ rogue_ninja14) – एक उत्कट कॉसप्लेयर, जिने आपले आवडते पात्र वास्तवात आणण्याचा छंद जोपासला आहे. व्यावसायिक कलाकार नसल्या तरी सर्जनशील कलाकृतीच्या प्रक्रियेस आणि कॉसप्लेमध्ये मिळणाऱ्या आनंदाला महत्त्व देतात.




कार्यक्रम तपशील:

दिनांक: 16 फेब्रुवारी 2025

वेळ: दुपारी 12 वाजल्यापासून पुढे

प्रवेश: सर्वांसाठी विनामूल्य

स्थळ: कला कॅफे अँड को-वर्क्स, बाणेर, पुणे

ही कार्यशाळा 8-9 मार्च 2025 रोजी असणाऱ्या "पुणे कॉमिक कॉन 2025" महोत्सवामध्ये मजेशीर आणि सर्जनशील दिवस साजरा करण्यासाठीचा एक मंच तयार करणार आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.